**MHKO100007182013**

## आदेश निशाणी क्र. ५१

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला "वादीचे दुरुस्त दावेस कैफीयत नाहीचा" आदेश रद्द होवून जादा कैफीयत दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २ याचा अर्ज व त्यावर वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी आपली जादा कैफीयत देणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. गेल्या वर्ष दीड वर्षापासून कोरोना या महाभयंकर विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाने देशात सर्वत्र लॉकडाऊन सुरु असलेने व वाहतुकीची साधनेही बरेर दिवस बंद असलेने वकीलांची भेट घेवून वेळे त्यांना माहीती पुरवून दुरुस्त दावेस कैफीयत देता आली नाही. दुरुस्त दावेस कैफीयत दाखल करणेस झालेला विलंब माफ करुन जादा कैफीयत दाखल करुन घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, अर्जातील कारणे योग्य नाहीत. मंजूर करणेत यावा व मंजूर करावयाचा झालेस प्रतिवादी यांचेवर कॉस्ट बसविणेत यावी. प्रतिवादी हे वादींना त्रास व्हावा याकरीता विलंब करीत आहेत. सबब सदरचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांची जादा कैफीयत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. याशिवाय मागील वर्षामध्ये कोरोना संसर्गामुळे न्यायालयीन कामकाज बंद होते. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ व २ यांची जादा कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे.

६. उभय पक्षांचे कथन पाहता या ठिकाणी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे (नागपूर बेंच) मधील ***Municipal Council, Hinganghat, Dist. Wardha V/s. Sudhirkumar***

***<u>Krushnakumar Sahani reported in 2010(3) Mah. L.J. Page No. 948 Bom. H.C. (Nagpur Bench)</u>*** या न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये "*Outer after limit for filing written statement is 90 days from the date of service of summons but where sufficient ground and reasons are shown the application though filed belatedly and casually, deserves to be allowed.*" असे अभिमत व्यक्त करण्यात आलेले आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आपली जादा कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांनी केलेल्या उशीरासाठी काही अंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

**१)** प्रतिवादी क्र. १ व २ यांचा निशाणी क्र. ५१ वरील अर्ज, वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र ) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांची जादा कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.
(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2022.08.03 11:52:23 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०२/०८/२०२२

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज